## स्थायी समिति
## दाखल विषय – दि. १८/८/२०२०

**विषय क्रमांक :– ४२१ त्वर्य**

पुणे महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू करणेसाठी मे.महाराष्ट्र शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/१४३, दि.२९/६/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ४२२ त्वर्य**

बालेवाडी स.नं.२०,२१ व बाणेर स.नं.१०९ येथील इमारतीमध्ये पंचशील फांउडेशन यांचेकडून उभारण्यात येणा–या कोव्हिड केअर हॉस्पिटल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांचे दरपत्रक दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून कोविड–१९ आजाराचा प्रादुर्भाव असेपर्यंत चालविण्यास देणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/एचओ/२३६ दि.१८/८/२०२० चे पत्र.

१.बालेवाडी स.नं.२०,२१ व बाणेर स.नं.१०९ येथील इमारतीमध्ये पंचशील फांउडेशन यांचेकडून उभारण्यात येणा–या कोव्हिड केअर हॉस्पिटल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) क अन्वये भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांना कोविड–१९ आजाराचा प्रादुर्भाव असेपर्यंत पहिल्या टप्यात भाकरे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांनी दिलेल्या न्युनतम दराप्रमाणे १०० बेडस चालविण्यास देणेस व आवश्यकतेनुसार बेडस्च्या संख्येत वाढ करणेस

२.वरील कामी येणारा खर्च आरोग्य खात्याकडील अर्थशिर्षक सन २०२०–२१ ‘‘अंतर्गत अत्यावश्यक महसूली खर्च कामासाठी खर्च RE17 F 257 COVID - 19" या अर्थशिर्षकमधुन करणेस

**विषय क्रमांक :– ४२३ त्वर्य**

कोथरुड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पडिक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे (सन २०२०–२१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे आशिष एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४,८२,२१,६५९=२० पेक्षा ६.४५% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५,१३,३१,९५६=२१ काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ आदा करणेस व सदर काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामास प्राईस बीडच्या दिनांकापासून काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस, बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र. २/२३३ दि.१७/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ४२४ त्वर्य**

आरोग्य खाते किटक प्रतीबंधक विभागासाठी बायफेन्थ्रीन १०% डब्लू.पी. पुरविणे (बी–१ पध्दतीने) कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी ठेकेदार मे.प्रोटेक्ट, मुंबई व एस.के.सेल्स, पुणे यांची निविदा एकसमान लघुत्तम आली (निविदा र.रु.६५,०१,३००/– पेक्षा ०.८०% ने कमी) असल्याने १) मे.प्रोटेक्ट, मुंबई यांचेकडून ७५० किलो व २) एस.के.सेल्स, पुणे यांचेकडून ७५० किलो असे एकूण १५०० किलो औषधाची एकूण र.रु.६४,४९,२८९=६० सर्व करांसह पर्यंत खरेदी करण्यास यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस त्यापोटी होणारे बिल सन २०२०–२१ RE17F114 (५ ख साथींचा बंदोबस्त जंतुनाशके विषारी औषधे) या अर्थशिर्षकावर खर्ची टाकण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२३५ दि.१८/८/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ४२५ त्वर्य**

कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत एकवट वेतनावर सहा महिने मुदतीकरिता ‘कार्यालयीन सहाय्यक’ यांची नेमणूक करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/टॅक्स/२३७ दि.१८/८/२०२० चे पत्र.

1) अन्य खात्याकडील लिपिक संवर्गातील अनुभवी ४०० सेवकांची कर आकारणी व कर संकलन विभागाकडे नेमणूक केल्यानंतर सदर खात्याकडील प्रशासकीय गैरसोय होऊ नये म्हणून ४०० सेवकांची नेमणूक आपल्या मान्य सेवाप्रवेश नियमाप्रमाणे दोन पध्दतीने करु शकणार आहे जसे बाह्य यंत्रणेमार्फत (out sourcing) बाह्य यंत्रणेमार्फत निविदेने व नेमणूकीची पुढील कार्यवाही कर आकारणी व कर संकलन विभागाने

करावी तर एकवट मानधनावर घ्यायचे झाल्यास यात मनपाच्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना प्राधान्य देण्यात यावे तसेच आवश्यक्यतेनुसार बाह्य यंत्रणेमार्फत ( out sourcing) एकवट वेतनावर सहा महिने मुदतीकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कोव्हिड- १९ साथीचे कामकाज / विविध कार्यालयाकडील कामकाजास नेमणूक करण्यास

२) सदर तात्पुरत्या मंजूर पदांचे भरती आरक्षणानुसार एकवट वेतनावर पदभरती करताना १०० बिंदु नामावली नोंदवही तयार करुन मा. उप आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांचेकडून तपासून घेणे आवश्यक असल्याने सदरची कार्यवाही कर आकारणी व कर संकलन विभागाने करणेस.

३) सामान्य प्रशासन विभागास आवश्यक असणारी माहिती उदा.उमेदवारांचे फोटोसह ओळख व पत्ता पटविणारी आणि अर्हता विषयक मूळ कागदपत्रे आणि एकवट वेतनावर पदभरती करताना गुणवत्तेवर (Objective Assesment) नियुक्ती करावी (मुलाखत घेता येणार नाही) त्या दृष्टीने अर्हता विषयक मूळ कागदपत्रे याबाबतची कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागाने योग्य तंत्रज्ञाचा वापर करून सदरची उमेदवारांची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतरित करणेस

४) सामान्य प्रशासन विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने एकवट वेतनावर पदभरतीसाठी मा. खातेप्रमुख, मा.मुख्यलेखा परीक्षक, मा. उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांची निवड समिती गठीत करून त्यांचे अथवा संबंधित अधिकारी यांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत निवड प्रक्रिया राबवावी. सदर निवड समिती अहवाल (निवड यादी व प्रतीक्षा यादीसह) मा. महापालिका आयुक्त यांचे मंजुरीस सादर करावा व मा.अति. महापालिका आयुक्त(ज) यांचे मान्यतेने आज्ञापत्र प्रसृत करणेची कार्यवाही करणेस

५) नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्र तपासणी व पुणे महानगरपालिकेकडील प्रचलित पद्धतीनुसार, उमेदवारांचे एक महिन्याचे वेतन अनामत ठेवणे तसेच उमेदवारांसोबत करार करणेची कार्यवाही कर आकारणी व कर संकलन विभागाने करणेस

६) प्रस्तावित तात्पुरत्या नियुक्त उमेदवारांचे मासिक वेतनाचा खर्च कर आकारणी व कर संकलन विभागाकडील कोणत्या निधीमधून उपलब्ध करावा याबाबत निर्णय घ्यावा लागेल, तसेच सदर उमेदवारांचे मासिक वेतन अदा करण्याची कार्यवाही कर आकारणी व कर संकलन विभागाकडून अदा करणेस.

७) (अ) माहिती व तंत्रज्ञान विभागास उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची व्यवस्था करणेस (ब) कर आकारणी व कर संकलन विभागाने मुद्दा क्र.२ प्रमाणे कार्यवाही करणेस (अ) व (ब) प्रमाणे कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रातील तक्त्यातील शैक्षणिक अर्हतेनुसार अर्ज स्विकारणेचा कालावधी निश्चित करून अटी व शर्तीसह स्थानिक वृत्तपत्रात सामान्य प्रशासन विभागामार्फत जाहिरात देण्यास.

८) सदर उमेदवारांना किमान वेतन कायद्यानुसार अंदाजे रक्कम रु.१९२५०/- दरमहा एकवट मानधन देणे आवश्यक आहे. सदरचा एकवट वेतनावरील खर्च नियमित सेवकांच्या वेतन तरतुदीतून करू नये.

९) सदर ४०० उमेदवारांना किमान वेतन कायद्यानुसार दरमहा अंदाजे एकवट मानधन रक्कम रु.१९२५० प्रमाणे रक्कम रु.७७,००,०००/- (सत्याहत्तर लाख) येणार असून ६ महिने कालावधीकरिता येणारा ४,६२,००,०००/- (चार कोटी बासष्ट लाख) एवढा खर्च कर आकारणी व कर संकलन विभागाकडील अर्थ शीर्षकावर खर्ची टाकणेस.

**विषय क्रमांक :– ४२६ त्वर्य**

मा.आबा बागुल, मा.सौ.दिपाली धुमाळ,विरोधी पक्षनेत्या व मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.१८/८/२०२० चे पत्र.

पुणे महापालिकेची १९ प्रसूतीगृहे असून त्यामधील फक्त दोनच प्रसूतीगृहामध्ये येणारे गर्भवती महिलांना पूर्ण सकस आहार दिला जातो. मागील १० वर्षातील प्रसूतीगृहांची माहिती घेतली असता सिझर डिलिव्हरी करण्याचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. गर्भवती महिलांना योग्य व सकस आहार देणे महापालिकेचे प्राथमिक कर्तव्य असून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यायाम करून घेणे, योग्य औषधे देणे अत्यावश्यक असून यावर उपाय योजना केल्यास सिझर डिलिव्हरीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

नॉर्मल डिलिव्हरीचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करणेची जबाबदारी प्रशासनाची असून महिलांचे आरोग्य सृदृढ ठेवणेसाठी सर्व प्रसूतीगृहांमध्ये योग्य दक्षता घेणेची प्रक्रिया तातडीने सुरळित करावी. जेणेकरून पुणे शहरातील आर्थिक दुर्बल व गोरगरीब महिला प्रसूतीसाठी मनपाच्या प्रसूतीगृहांमध्ये येत असून त्यांना सिझर डिलिव्हरींना सामोरे जावे लागणार नाही.

पुणे महापालिकेच्या सर्व प्रसूतीगृहात पुणे शहरातील आर्थिक दुर्बल व गोरगरीब कुटुंबातील गर्भवती महिलांना पूर्ण व सकस आहार देणेची तात्काळ व्यवस्था करावी. आमच्या माहितीप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये तरतूद उपलब्ध असून आवश्यकता वाटल्यास अनेक संस्था सी.एस.आर. माध्यमातून सुविधा पुरविणेस तयार आहे. सदर विषयी पुढील कार्यवाही तत्परतेने करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ४२७ त्वर्य**

मा.महेश वाबळे व मा.अजय खेडेकर यांचे दि.१७/८/२०२० चे पत्र.

सध्यःस्थितीमध्ये संपुर्ण देशामध्ये तसेच पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूने मोठया प्रमाणावर थैमान घातलेले आहे. यामुळे शासनामार्फत मार्च २०२० पासून लॉकडाउन करण्यात आलेले होते. यामुळे पुणे महानगरपालिकेचे विविध क्रीडा संकुले, भाजी मार्केट स्टॉल्स्, इ. भाडे तत्वावर देण्यात येणा–या मिळकती देखील बंद अवस्थेत होत्या. यामुळे सदरील मिळकतीमध्ये सुरु असलेल्या व्यवसायापोटी दैनंदिन व मासिक मिळणारे उत्पन्न बंद झालेले आहे. यामुळे अनेकांचा उदरनिर्वाह बंद झालेला आहे. तसेच जर लॉकडाउन काळात बंद असलेल्या मिळकतींचे भाडे पुणे मनपामार्फत आकारल्यास ते भरणे संबंधितांस शक्य नाही. तसेच ज्यांचेमार्फत भाडे वसूल केले जाते त्यांचे भाडे माफ करण्यात यावे व त्याचप्रमाणे पुणे मनपाच्या मिळकतींपोटी ज्यांचे समवेत करार करण्यात आलेले आहेत, अशा मिळकती धारकांना करार संपल्यानंतर लॉकडाउन कालावधी एवढी मुदत वाढ देण्यात यावी.

तरी कोरोना विषाणू सारख्या महामारीमुळे लॉकडाउन काळामध्ये पुणे मनपाच्या विविध प्रकारच्या भाडे तत्वावर देण्यात आलेल्या मिळकतींपोटी भाडे आकारण्यात येवू नये.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**